# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


**क्र.मजीप्रा-२०२०/सभा-१४६/(०८)/आ.४** **दिनांक : १८.९.२०२०**

**प्रति,**
मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**विषय :** दि.२ सप्टेंबर, २०२० रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४६ व्या बैठकीचे इतिवृत्त.

**महोदय,**

दि.२ सप्टेंबर, २०२० रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४६व्या बैठकीचे इतिवृत्त आपल्या माहितीसाठी सोबत सादर करण्यात येत आहे.

**आपली विश्वासू,**

**(दिपाली देशपांडे-सावेडकर)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी.**

.....२/-

**प्रत माहितीसाठी.**

खाजगी सचिव (मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

खाजगी सचिव (मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
सोबतचे इतिवृत्त मा.राज्यमंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत : माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता, म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे /पुणे /नाशिक/औरंगाबाद /अमरावती/ नागपूर.

अधीक्षक अभियंता, म.नि.सं. व सं., मित्तल चेंबर्स, मुंबई.

अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई.

उप मुख्य लेखाधिकारी (१ / २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. सिडको भवन, नवीन मुंबई.

उप अभियंता तथा मालमत्ता व्यवस्थापन (कक्ष – ९) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता (आय.टी.सेल), मित्तल चेंबर्स, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना -          ) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

**सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.**

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४६ व्या बैठकीचे इतिवृत्त.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १४६ वी बैठक मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.गुलाबराव पाटील यांचे अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक २ सप्टेंबर, २०२० रोजी दुपारी १.०० वाजता समिती सभागृह क्र.३, ७वा मजला, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. या बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य तसेच प्रतिनिधी उपस्थित होते.

१) मा.श्री.गुलाबराव पाटील, मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) मा.श्री.एकनाथ शिंदे, मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष,
३) मा.श्री.हसन मुश्रीफ, मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष,
४) मा.श्री.प्राजक्त तनपुरे, राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष,
५) श्री.संजय चहांदे, अपर मुख्य सचिव, पा.पु. व स्वच्छता विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य.
६) ~~मा~~.श्री.अभय महाजन, सदस्य सचिव, म.जी.प्रा. तथा प्राधिकरणाचे सदस्य सचिव, मुंबई.

या व्यतिरिक्त सदर बैठकीस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी उपस्थित होते.

१) श्री.वाय.बी.पाटील, संचालक (वित्त), म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.
२) श्रीमती.दिपाली देशपांडे-सावेडकर, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई.
३) श्री. प्रशांत भामरे, अधीक्षक अभियंता (मु.)

सर्व प्रथम मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, यांच्या परवानगीने बैठकीस सुरुवात करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.१ : म.जी.प्रा. च्या १४४ व्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता देणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या १४५ व्या सभेमध्ये १४४ व्या बैठकीचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आले होते. तथापी १४५व्या बैठकीचे इतिवृत्त अंतिम न झाल्याने १४४ व्या बैठकीचे इतिवृत्त मान्यतेसाठी १४६ व्या बैठकीमध्ये ठेवण्यात येत आहे. सदर बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव संचालक मंडळास सादर करण्यात आला व त्यास मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी संचालक मंडळास केली.

इतिवृत्तावर चर्चा होऊन, १४४ व्या बैठकीच्या इतिवृत्तास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.२: म.जी.प्रा.च्या १४४ व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेली कृती.**

म.जी.प्रा. च्या संचालक मंडळाची १४४ वी बैठक दि.५ मार्च, २०१९ रोजी संपन्न झाली असून सदर कार्यक्रम बाबींवर घेण्यात आलेल्या निर्णयावर करण्यात आलेली कृती बाबतचा कार्यपुर्ती अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४५ व्या बैठकीत ठेवण्यात आला होता. तथापी १४५ व्या बैठकीचे इतिवृत्त अंतीम न झाल्याने १४४ व्या सभेमध्ये ठेवण्यात आलेल्या कार्यक्रम बाबींवर घेण्यात आलेल्या निर्णयावर करण्यात आलेली कृती सोबत जोडण्यात आली आहे. त्यास संचालक मंडळाची मान्यता मिळावी.

सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. त्यानुसार १४४ व्या बैठकीपुढील बाबींवर करण्यात आलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाने चक्राकार पध्दतीने मान्यता दिलेल्या ठरावांबाबतचा कार्यपुर्ती अहवाल.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४६ व्या बैठकीमध्ये ठेवावयाच्या कार्यक्रम बाबींवर तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असल्याने सदरच्या कार्यक्रम बाबीस चक्राकार पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कार्यक्रम बाबींवर घेण्यात आलेल्या निर्णयावर करण्यात आलेली कृती बाबतचा कार्यपुर्ती अहवाल व त्याबाबत मा.सदस्य सचिव, यांनी संचालक मंडळास अवगत केले. कृतीपुर्ती अहवालानुसारच्या करण्यात आलेल्या कार्यवाहीस संचालक मंडळाने मान्यता दिली.

**कार्यक्रम बाब क्र.४ : पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी “विधी अधिकारी” उपलब्ध करुन देणे बाबत.**

उप सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.१३.१.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे की, पाणी पुरवठा विभागामार्फत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा तसेच जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापना विषयक बाबी हाताळण्यात येतात. या बाबी हाताळताना म.जी.प्रा., जिल्हा परिषद तसेच भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेमधील अनेक अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत वारंवार

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

न्यायालयीन प्रकरणे विविध कारणांमुळे दाखल केली जात आहेत. वरील वस्तुस्थितीचा विचारात घेता, पाणी पुरवठा विभागाकडील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा मार्फत कंत्राटी पध्दतीने एक पूर्ण वेळ “विधी अधिकारी” या विभागास उपलब्ध करुन द्यावा.

शासन निर्देशाप्रमाणे पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी विधी अधिकारी उपलब्ध देणेबाबतची कार्यक्रम बाबत संचालक मंडळासमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आली. त्यास संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करणेत येतो की, महाराष्ट्र शासनाच्या महसुल, वन विभाग तसेच गृह विभागाच्या धर्तीवर पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे न्यायालयीन प्रकरणे हाताळणेसाठी प्राधिकरणाच्या स्तरावरुन विधी अधिकारी सेवा देण्यासाठी विधी सल्लागाराची निवड कंत्राटी पध्दतीने खुल्या बाजारातून सेवा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे. सदर पदासाठीची अर्हता तसेच निवड प्रक्रिया निश्चित करण्याची जबाबदारी सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांची राहील. सदर पदावर फक्त ११ महिन्यांकरीता नियुक्ती देण्यात यावी. विधी अधिकारी उपलब्ध करुन देण्यासाठी निवड झालेल्या सेवा पुरवठादारास भत्यासहीत एकूण मासिक सेवाशुल्क रु.६०,०००/- (मानधन रु.५५,०००/- व प्रवासभत्ता रु.५,०००/-) इतके देय राहील. तसेच न्यायालयीन कामासाठी मुंबई क्षेत्राबाहेर प्रवास करावा लागल्यास शासनाच्या गट-अ मधील अधिकाऱ्यास देय असणारे दैनिक भत्ते व प्रवासभत्ते देय राहतील. विधी अधिकारी सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी सेवा पुरवठादाराची निवड करण्यासाठीच्या जाहिरातीनंतर उपलब्ध सेवा पुरवठादारांतून अंतिम सेवा पुरवठादाराची निवड करण्याची कार्यवाही सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समिती करील. सदर ठरावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.५ : राज्य सार्वजनिक उपक्रमांच्या अतिरिक्त निधीची गुतवणूक संदर्भातील सुधारित मार्गदर्शक तत्वे.**

राज्य सार्वजनिक उपक्रमाने अतिरिक्त निधीची गुंतवणूक करण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी जी मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येतात त्याच्या अधिन राहून मजीप्रा कडून शिल्लक निधीची गुंवणूक करण्यात येते, या गुंतवणूकीच्या संदर्भात शासनाकडून शासन निर्णय क्र.शासाउ-१०.१५/प्र.क्र.४२/सा.उ. दि.२७.१०.२०१५ व शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/ प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५ दि.१३.३.२०२० निर्गमीत करण्यात आला. सदरहू शासन निर्णयातील गुंतवणूकीसाठी निश्चित केलेले सर्व निकष प्राधिकरणाचे सर्व सदस्यांना अवगत करण्यात आले.

मजीप्रा कडील एकूण अतिरिक्त निधीची अल्प व दिर्घ मुदतीतील गुंतवणूक ही शासन निर्णय दि.२७.१०.२०१५ व दि.१३.३.२०२० नुसार राष्ट्रीयकृत बँकाकडे करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी चर्चा करण्यात येऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करणेत येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील एकूण शिल्लक निधीची गुंतवणूक ही वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.५१/२०/कोषा प्रशा-५ दि.१३.३.२०२० नुसार राष्ट्रीयकृत बँकाकडे करण्याबाबत मंजूरी देण्यात येत आहे. याबाबतची कार्यवाही करण्यासाठी सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.६ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतवणूकीसाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळणेबाबत.**

सदर प्रकरणी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी संचालक मंडळास सविस्तर माहिती सादर केली.

सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरती शिल्लक रक्कम योग्यरित्या गुंतवावी याबाबत शासनाने दि. २७.१०.२०१५ व दि.१३.३.२०२० अंतर्गत सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

त्यानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूका केल्या जातात. असे संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १४१व्या बैठकीत दि.८.९.२०१७ ते दि.१५.३.२०१८ या कालावधीच्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीचे प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यास मान्यता प्राप्त झाली आहे. आता दि.१६.३.२०१८ ते दि.१८.६.२०२० या कालावधीत केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस संचालक मंडळाची मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर चर्चा करण्यात येऊन खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करणेत येतो की, दि.१६.३.२०१८ ते दि.१८.६.२०२० या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे करण्यात आलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात येत आहे. याबाबतची कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : दि.१/१/२००६ ते २६/२/२००९ या कालावधीतील निवृत्तीवेतन/ कुटूंब निवृत्तीवेतन यामध्ये सुधारणा करण्याबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.२.९.२०२० रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०१५/एसएलपी/प्रक्र ५/ सेवा-४, दि.२७/१२/२०१८ अन्वये दि.१/१/२००६ ते २६/२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करणेबाबत राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला असून सदर शासन निर्णय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील दि.१/१/२००६ ते २६/२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना लागू करण्यास व त्यांचे सुधारीत निवृत्तीवेतन निश्चिती करण्याबाबतच्या प्रस्तावावर बैठकीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सदर प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. मात्र सदर कालावधीतील थकबाकी निधी उपलब्धतेच्या अधिन राहून सेवानिवृत्तीवेतन धारकांना अदा करण्यास मान्यता देण्यात आली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**ठराव :-**

महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.न्यायाप्र-२०१५/एसएलपी/प्रक्र ५/ सेवा-४, दि.२७/१२/२०१८ अन्वये दि.१/१/२००६ ते २६/२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनात/कुटुंब निवृत्तीवेतनात सुधारणा करणेबाबत धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने घेतला असून सदर शासन निर्णय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील दि.१/१/२००६ ते २६/२/२००९ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना लागू करण्यास व त्यांचे सुधारित निवृत्ती वेतन निश्चित करण्यास मंजूरी देण्यात आली. मात्र सदर कालावधीतील थकबाकी निधी उपलब्धतेच्या अधिन राहून सेवानिवृत्तीवेतन धारकांना अदा करण्यास मान्यता देण्यात आली. याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८ : दि.१/१/२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/मृत पावलेल्या सेवानिवृत्त निवृत्तीवेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना मृत्यू-नि-सेवा उपदानाची उपदानाची कमाल मर्यादा रु.७.०० लाख करणे.**

दि.१/१/२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/ मृत पावलेल्या राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक/ कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना मृत्यू-नि-सेवा उपदानाची कमाल मर्यादा रु.७.०० लाख करणेबाबतचा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.सेनिवे-२०१५/प्रक्र ०१/सेवा-४, दि.४/२/२०१५ अन्वये घेतला असून सादर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सदर शासन निर्णय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील दि.१/१/२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/मृत पावलेल्या निवृत्तीवेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना लागू करण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. चर्चेअंती सदर प्रस्तावास संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की,

दि.१/१/२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/ मृत पावलेल्या राज्य शासकीय निवृत्तीवेतनधारक/ कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना मृत्यू-नि-सेवा उपदानाची कमाल मर्यादा रु.७.०० लाख करणेबाबतचा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाने वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.सेनिवे-२०१५/प्रक्र ०१/ सेवा-४, दि.४/२/२०१५ अन्वये घेतला असून सदर शासन निर्णय महाराष्ट्र जीवन

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्राधिकरणातील दि.१/१/२००६ रोजी किंवा त्यानंतर सेवानिवृत्त झालेल्या/मृत पावलेल्या निवृत्तीवेतनधारक/कुटूंब निवृत्तीवेतनधारकांना लागू करण्यास मंजूरी देण्यात आली. याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.९ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१५-१६ चा अंतिम लेखा परिक्षण अहवाल.**

सन २०१५-१६ चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे वार्षिक लेखे दि.१९ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मा.संचालक मंडळाच्या १४० व्या बैठकीत स्विकृत करण्यात आलेले आहेत. आता, महालेखापाल, मुंबई कार्यालयाकडून लेखा परिक्षण अहवाल त्यांचेकडील गोपनीय प.क्र.संख्या/पु.ले.प्र./मजीप्रा/२०१५-१६/७७, दि.८/८/२०१८ पृ.क्र.१/प अन्वये प्राप्त झाला आहे. सन २०१५-१६ चे वार्षिक लेखे महालेखापालांनी प्रमाणित केले आहेत. महालेखापाल-१, मुंबई यांनी दिलेला लेखा परिक्षण अहवाल प्राधिकरणास दि.२०.८.२०१८ रोजी प्राप्त झाला आहे. हा अहवाल अनुपालनासह प्राधिकरणाच्या मान्यतेकरिता या कार्यक्रम बाबीद्वारे सादर केला आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.२.९.२०२० रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत प्राधिकरणाचा सन २०१५-१६ चा अंतिम लेखा परिक्षण अहवाल संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आला. अंतिम लेखा परिक्षण अहवालाची सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सन २०१५-१६ चा अंतिम लेखा परिक्षण अहवाल,कार्यक्रम बाब क्रमांक- ९ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारित केला.

## ठराव

असा ठराव मंजूर करण्यात येतो की, प्राधिकरणाच्या सन २०१५-१६ च्या वार्षिक लेखा परिक्षण अहवालास अनुपालनासह मान्यता देण्यात येत आहे. तसेच सन २०१५-१६ चे वार्षिक लेखे, या लेखा परिक्षण अहवालासह महाराष्ट्र राज्याच्या विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे सादर करण्याकरिता शासनाकडे पाठविण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.

या प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरणाचे सदस्य सचिव, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१० : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्यामध्ये वाढ करण्याबाबत १४२व्या सभेमधील कार्यक्रम बाबीवरील इतिवृत्तामध्ये सुधारणा करणे बाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची बैठक दि.२.९.२०२० रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्यामध्ये वाढ करण्याबाबत १४२व्या सभेमधील कार्यक्रम बाबीवरील इतिवृत्तामध्ये सुधारणा करणेबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना महागाई भत्यामध्ये वाढ करण्याबाबत १४२व्या सभेमधील कार्यक्रम बाबीवरील इतिवृत्तामध्ये सुधारणा करणेबाबत, कार्यक्रम बाब क्र.१० अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेला निधी व प्राप्त होणाऱ्या महसूलातून माहे जून देय जुलै - २०१८ या महिन्यात अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच यापुढे राज्य शासनाकडून वेळोवेळी मंजूर होणाऱ्या महागाई भत्याच्या वाढीप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे कर्मचाऱ्यांना महागाई भत्ता अदा करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे. त्याऐवजी राज्य शासनाकडून वेळोवेळी मंजूर होणाऱ्या महागाई भत्याच्या वाढीप्रमाणे म.जी.प्रा. चे कर्मचाऱ्यांना व निवृत्ती वेतन धारकांना महागाई भत्ता अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यापुढे महागाई भत्यासाठी संचालक मंडळाची स्वतंत्र मान्यता घेण्याची आवश्यकता नसलेबाबत संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.११ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१६-१७ चा वार्षिक प्रशासनिक अहवालास मान्यता देणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१६-१७ चा वार्षिक प्रशासनिक अहवालाबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर कार्यक्रम बाबीवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बाबतचा ठराव खालील प्रमाणे पारीत करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा सन २०१६-१७ या वर्षाचा वार्षिक प्रशासनिक अहवाल स्विकृत करण्यात येत असून, तो विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्यास मा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१९-२० चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकाबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.२.९.२०२० रोजी संपन्न झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१९-२० चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१९-२० चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाजत्रकाबाबत, कार्यक्रम बाब क्र.१२ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, प्राधिकरणाचे सन २०१९-२० चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०२०-२१ चे महसुली व भांडवली अर्थसंकल्पीय अंदाज खालील प्रमाणे मान्य करण्यात येत आहे.

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशिल | सन २०१९-२० चे सुधारित अंदाज | सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज |
|---|---|---|---|
| १. | महसुली जमा | १०३७२३.८१ | ८५४७८.७६ |
| २. | महसुली खर्च | ८३५६०.७२ | ९४४९३.१९ |
| ३. | भांडवली जमा | १२३४३०.०० | ७६९५०.६५ |
| ४. | भांडवली खर्च | १२३४३०.०० | ७६९५०.६५ |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

१२ (४५)

**असा ठराव करण्यात येतो की,**

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०२०-२१ साठी रु.१९०.०० कोटी, अधिकारी / कर्मचारी यांना वेतन व भत्यासाठी नियमित आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांसाठी अनुदान मागितले आहे. प्रत्यक्ष वेतन व भत्यासाठी लागणारा खर्चाचे सदर अनुदान म.जी.प्रा.स उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच उर्वरित अनुदान रु.४१.०३ कोटी अनुदान सुध्दा उपलब्ध करुन द्यावे.

२) वेतना व्यतिरिक्त इतर भत्यांच्या मागणीमध्ये समावेश केला नाही. प्रवास भत्ता, वैद्यकिय प्रतिपूती, तो विभागीय कार्यालयाकडून प्रस्ताव यासाठी स्वतंत्रपणे मागणी करण्यात येईल.

३) निवृत्तीवेतनासाठी महाराष्ट्र शासन, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे लेखाशिर्ष क्र.२२१५A०५२ लेखाशिर्षामध्ये तरतूद केली आहे. शासनाने सन २०१९-२० मध्ये रु.२५३.४३ कोटी मंजूर केले आहेत व खर्च रु.२६१.२८ कोटी झाला आहे.त्यापैकी रु.२०२.७४ कोटी म.जी.प्रास प्राप्त झाले आहेत. उर्वरित अनुदान शासनाने सन २०१९-२० साठी रु.१२७.१७ कोटी व सन २०२०-२१ साठी रु.३३८.३० कोटी अनुदान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास उपलब्ध करुन देण्यात यावेत.

४) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे पुरक मागणीव्दारे रु.१०६०३.०० लक्ष निधी मागणी केलेली आहे. दि.२३.३.२०१७ ते दि.३०.११.२०१७ या कालावधीत मजीप्राच्या नियमित कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यासाठी रु.१०६०३.०० लक्षाची पुरक मागणी व सुधारीत वाहतूक भत्यापोटी रु.१५४.०० लक्ष अशी एकूण रु.१०७५७.०० लक्ष पूरक मागणी करण्यात आली आहे. तसेच निवृत्तीवेतन धारकांची रु.२०३६३.०० लक्ष पुरक मागणी केलेली आहे. शासनाने हिवाली अधिवेशन २०१९ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वेतन व भत्यापोटी लेखाशीर्ष क्र. क्र.२२१५A०४१ अंतर्गत सहाय्यक अनुदान रु.६५००.०० लक्ष व निवृत्तीवेतनासाठी रु.१३५००.०० लक्ष असे एकूण रु.२००००.०० लक्ष सहाय्यक अनुदान मंजूर केले आहे. शासनाकडुन पुरक मागणी व्दारे प्राप्त झालेले रु.२००००.०० लक्ष सहाय्यक अनुदान हे दि.२३.३.२०१७ ते दि.३०.११.२०१७ या कालावधीचे असल्यामुळे याचे योग्य ते समायोजन करण्यात येईल.

५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने शासनाकडे मजीप्राच्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांसाठी सन २०२०-२१ मध्ये रु.३३८.३० कोटीची अंदाजपत्रकीय तरतुद मागवलेली होती. परंतु शासनाने रु.२५०.९० कोटी तरतुद सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पामध्ये केली असल्याने रु.९०.१४ कोटीची तुट दिसून येते. शासनाने सदर अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठवावा.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१३ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २०१७-१८ चे वार्षिक लेखा मंजूरी बाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.२.९.२०२० रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत प्राधिकरणाचा सन २०१७-१८ या वर्षाचे वार्षिक् लेखे संचालक मंडळाच्या अवलोकनार्थ व मान्यतेसाठी सादर करण्यात आला. वार्षिक लेख्याबाबतची सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंती सन १०१७-१८ चा वार्षिक लेख्यास, कार्यक्रम बाब क्र.१३ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :**

१) असा ठराव करण्यात येतो की, सन २०१७-१८ या वर्षाचे वार्षिक लेखे स्विकृत करण्यात आले आहेत.

२) असाही ठराव करण्यात येतो की, सन २०१७-१८ या वर्षाचे वार्षिक लेखे प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकरणाचे मा.अध्यक्ष व सदस्य सचिव, यांनी प्रमाणीत करावेत.

३) तसेच असाही ठराव करण्यात येतो की, स्वीकृत लेख्यांमध्ये मांडण्यात आलेल्या कामाच्या निष्कर्षामध्ये ज्यांच्यामुळे कोणताही महत्वाचा फरक पडणार नाही. अशास किरकोळ स्वरुपाच्या दुरुस्त्या प्राधिकरणाच्या मा.संचालक (वित्त) व मा.सदस्य सचिव, यांच्या स्वाक्षरीने करता येतील.

४) स्वीकृत लेखा महालेखापाल मुंबई, यांना लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देणे, इत्यादीसाठी मा.सदस्य सचिव, यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१४ : नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी आयुर्विमा महामंडळाकडून घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीस स्थगिती बाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.२.९.२०२० रोजी संपन्न झाली. बैठकीत आयुर्विमा महामंडळाच्या कर्ज परतफेडीच्या रक्कमेची (परतफेड, तमा) एक रक्कमी परतफेडीस स्थगितीबाबतच्या प्रस्तावासंबंधी करावयाच्या कार्यवाही बाबतची कार्यक्रम बाब क्र.१४ मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केली.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

दि.१.१.२०१९ ते दि.१.६.२०२० रोजीची कर्जपरतफेडीपोटी आयुर्विमा महामंडळास अदा करावयाची अनुज्ञेय / प्राप्त रक्कम पुढील OTS प्रस्ताव मान्य होईपर्यत स्थगित ठेवण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर प्रस्तावावर कर्चा करण्यात येवून प्रस्तावास मा.संचालक मंडळाची मान्यता प्रदान करण्यात आली आहे व खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव पारित करण्यात येतो की, "जो पर्यत शासन स्तरावरुन आयुर्विमा महामंडळाच्या कर्जाच्या हप्त्याच्या एकरकमी परतफेडीपोटी अनुदान उपलब्ध होत नाही. तो पर्यत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून देखील आयुर्विमा महामंडळास अदा करावयाची अनुज्ञेय/ प्राप्त रक्कम आयुर्विमा महामंडळास प्रदान करण्यात येणार नाही" तथापी या प्रकरणी शासनाचे अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) व प्रधान सचिव (नगर विकास) यांचे समवेत बैठक आयोजित करुन या बाबत चर्चा करुन पुढील निर्णयास्तव संचालक मंडळास अवगत करावे.

**कार्यक्रम बाब क्र.१५ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यात येणाऱ्या ग्रामीण/नागरी पाणी पुरवठा व मलनि:सारण योजनांच्या अभियांत्रिकी कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे पॅनल तयार करणे व विविध स्तरावरील व्यवस्थापनासाठी सल्लागारांची नेमणूक करणे च्या निविदेबाबत.**

वरील विषयांकित कार्यक्रम बाब क्रमांक.१५ दि.२.९.२०२० रोजी झालेल्या मजीप्राच्या संचालक मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यासाठी सादर करण्यात आली. या प्रकरणी सदस्य सचिव, मजीप्रा यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळास अवगत केली.

**प्रस्तावना :**

**अ) मनुष्यबळ नियोजन :-**

मजीप्राकडे योजनांची आखणी करणे, सर्वेक्षण, संकल्पने, अंदाजपत्रके व आराखडे तयार करणे व योजना राबविण्याची कामे करण्यात येत आहेत. तसेच मजीप्रामार्फत मजीप्राच्या मालकीच्या योजनांची तसेच ग्रामीण अहस्तांतरीत पाणी पुरवठा योजनांची देखभाल-दुरुस्तीची कामे ही करण्यात येतात.

अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.

केंद्र सरकारच्या अमृत, राज्य शासनाच्या नगरोत्थान योजनेंतर्गत मजीप्राची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. त्या प्रमाणे ग्रामीण पाणी पुरवठा (जल जीवन कार्यक्रम) योजना सुध्दा मजीप्रामार्फत राबविण्यात येत आहेत. पूर्ण ठेव तत्वावर इतर विभागांची कामेही मजीप्रामार्फत करण्यात येतात तसेच मराठवाडा वॉटरग्रीड सारखा महत्वकांक्षी प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. परंतु सद्य:स्थितीत मजीप्रामधील अनुभवी अभियंता व कर्मचारी वर्ग मोठ्या प्रमाणात सेवानिवृत्त होत आहे. जानेवारी २०२० मध्ये मजीप्रामध्ये स्थाई आस्थापनापोटी ४८५६ पदांपैकी २३६२ पदे रिक्त होती व सद्य:स्थितीत २६४३ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची संख्या सातत्याने वाढत असल्याने, सदर केंद्र शासनामार्फत तसेच राज्य शासनाच्या योजना राबविताना, अभियंता व कर्मचारी वर्गावर कामे करताना ताण पडत आहे. याकामासाठी बाह्ययंत्रणा आवश्यक आहे.

**ब) मजीप्राच्या विविध विभागीय स्तरावरील नियोजन :-**

वर नमूद केल्याप्रमाणे कमी मनुष्यबळ असल्यामुळे यंत्रणेवर ताण पडत आहे. मजीप्रामार्फत पूर्वी केंद्र शासनाच्या व राज्य शासनाच्या योजना राबविताना, ईटीपी पोटी १७.५ टक्के पर्यंत उत्पन्न प्राप्त होत होते. परंतु सध्या शासनामार्फत मजीप्राला प्रकल्प व्यवस्थनापोटी नागरी योजनांसाठी ३ टक्के व ग्रामीण योजनांसाठी ४ टक्के तसेच जलस्वराज्य-२ च्या योजनांसाठी व ठेव तत्वावरील कामासाठी सरासरी ७ टक्के पर्यंत शुल्क उपलब्ध होतात.

वरील योजनांपैकी, नागरी योजनांचीच किंमत जास्त असते परंतु त्यापोटी मिळणाऱ्या प्रकल्प व्यवस्थापन शुल्काची रक्कम ३ टक्केच असल्याने, आस्थापनापोटी होणारा खर्चही भागविणे शक्य होत नाही. नगरपालिका/ महानगरपालिका मार्फत प्रकल्प व्यवस्थापन शुल्काची अदायगीही मजीप्राला वेळेत होत नाही.

वरील सर्व आर्थिक बाबी लक्षात घेता भविष्यात मजीप्रास होणारी संभाव्य तुट भरुन काढण्यासाठी, मध्यवर्ती कार्यालय, वित्त शाखा, आस्थापना शाखा, गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, कायदा व कामगार विभाग, खरेदी व माहिती व तंत्रज्ञान (IT) मध्यवर्ती नियोजन व संकल्पन विभाग अशा विविध स्तरावरील बाबींचे नियोजन करणे गरजेचे आहे.

वरील सर्व मनुष्यबळाचा/अभियांत्रिकी तसेच विविध स्तरावरील नियोजन करण्यासाठी खालील बाबींसाठी सल्लागारांची नेमणूक करणे गरजेचे आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

१) अभियांत्रिकी कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करणे.

२) मजीप्राच्या विविध स्तरावरील व्यवस्थापनाच्या संचालनाकरिता सल्लागारांची नेमणूक करणे.

१. मजीप्राच्या अभियांत्रिकी कामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करणे.

अ) प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या कामांची व्याप्ती (Scope)

१ पुनर्सर्वेक्शन कामे व विविध शक्यतादर्शक अहवाल तयार करणे.

२ सविस्तर सर्वेक्षण करणे,प्रकल्प अहवाल तयार करणे व विविध विभागांकडून आवश्यक मान्यता प्राप्त करणे इ.

३ निविदा कागदपत्रे तयार करणे, विविध आवश्यक मान्यता प्राप्त करणे व निविदा प्रक्रिया पूर्ण करणे इ.

४ चालू कामावर देखरेख करणे व त्यांच्या दररोज अभिलेख/नोंदी ठेवणे.

५ देखभाल-दुरुस्तीच्या कामावर देखरेख करणे व त्यांच्या दररोज अभिलेख/नोंदी ठेवणे.

**ब) कामाच्या अंदाजित निव्वळ किंमतीवरील टप्पे व शुल्क :**

| वर्ग | प्रकल्प अहवाल किंमत (रुपये कोटीत) | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क (रुपये कोटीत) | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्क |
|---|---|---|---|
| १ | ५ ते २५ | ०.३७५ | २.५०% |
| २ | २५ ते ५० | ०.७४४८ | २.००% |
| ३ | ५० ते ७५ | १.०००९ | १.८०% |
| ४ | ७५ ते १०० | १.२२६३ | १.४०% |
| ५ | १०० ते २०० | १.८ | १.२०% |
| ६ | २०० ते ३०० | २.५ | १.००% |
| ७ | ३०० ते४०० | ३.१५ | ०.९०% |
| ८ | ४०० ते ५०० | ३.६ | ०.८०% |

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

भविष्यात अमृत अभियान, नगरोत्थान कार्यक्रम, ग्रामीण जल जीवन कार्यक्रम अशा अभियानांतर्गत योजनांच्या अंमलबजावणीची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून सरासरी १५ कोटी ते ५०० कोटीपर्यंतच्या विविध अभियानांतर्गत ६६ योजनांच्या ४ वर्षाच्या व्यवस्थापनाच्या पोटी खालीलप्रमाणे खर्च /उत्पन्न अपेक्षित आहे.

| सल्लागार | योजनां संख्या | DPR किंमत | १ वर्ष | २ वर्ष | ३ वर्ष | ४ वर्ष | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सल्लागार खर्च | ६६ | ६९८२.५ | १४.३५ | ३१.१३ | ३१.१३ | १२.०७ | ८८.६९ |
| सल्लागार शुल्क | | | १५३.०४ | ९७.२७ | ९७.२७ | ३८.८९ | ३८६.४७ |
| फायदा | | | **१६०.८१** | **८०.७७** | **८०.७७** | **३२.६६** | **३५५.०२** |

२) मजीप्राच्या विविध स्तरावरील व्यवस्थापनाच्या संचालनाकरिता सल्लागारांची नेमणूक करणे.

विविध स्तरावरील संचालनाकरिता कामांची व्याप्ती **(Scope)**

अ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आर्थिक व्यवस्थापनात विचारपूर्वक विस्तृत सुधारणा करणे.

१ मजीप्राच्या अस्तित्वातील अर्थसंकल्प, लेखा, अंतर्गत नियंत्रण, फंड फ्लो रेव्हेन्यू, डेबिट आणि लेनदेन व्यवस्थापन, अहवाल देणे आणि लेखा परीक्षण इत्यादींसह अस्तित्त्वात असलेल्या वित्तीय व्यवस्थापन प्रणालींचा संपूर्ण अभ्यास करणे.

२. विस्तृत अभ्यासात खालील बाबी समाविष्ट असतील.

अ) विस्तृत अभ्यासात खालील बाबी समाविष्ट असतील
डेस्क संशोधन -विद्यमान पुस्तिका, एसओपी, मार्गदर्शक तत्वे, मागील वर्षाचे लेखापरीक्षण अहवाल इत्यादींचा अभ्यास. सल्लागाराने RWSS ग्रामीण पाणी पुरवठा योजनांचा क्षेत्रातील विद्यमान आणि आगामी योजनांचा अभ्यास करणे.

ब) फील्ड व्हिजिट- सल्लागाराने नमुने आधारावर मजीप्राच्या कार्यालयात जाऊन वित्तीय व्यवस्थापन प्रणालीचे प्राथमिक मूल्यांकन करणे आवश्यक असेल. आर्थिक व्यवस्थापन व्यवस्था बळकट करण्यासाठी लक्ष देणारी क्षेत्रे ओळखण्यासाठी सल्लागारांना मुख्य व्यवस्थापन व्यक्ती, भागधारक इत्यादींच्या मुलाखती घेणे देखील आवश्यक असेल.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

३ अभ्यासाच्या आधारे अर्थसंकल्प, लेखा, अंतर्गत नियंत्रण इत्यादी सारख्या विविध क्षेत्रांसाठी कालबद्ध कृती आराखड्यासह मजीप्राची आर्थिक व्यवस्थापन व्यवस्था बळकट करण्याचे मार्ग सुचविणे

४ नियमावली तयार करणे, मानक कार्यपद्धती, डॅशबोर्ड, कागदपत्रे, स्वरूप इत्यादींसह एमजेपीच्या वित्तीय व्यवस्थापन प्रणालीच्या मजबुतीकरणासाठी मंजूर कृती योजनेच्या अंमलबजावणीमध्ये एमजेपीला तांत्रिक सहाय्य प्रदान करणे,

५ मॅन्युअल,मानक कार्यप्रणाली आणि डॅशबोर्ड इत्यादींच्या अंमलबजावणीमध्ये एमजेपी कर्मचाऱ्यांना क्षमता वाढवण्याचे प्रशिक्षण घेणे.

६ या व्यतिरिक्त, विद्यमान वित्तीय प्रणाली, संसाधन आणि जबाबदारीचे मॅपिंग, पदानुक्रम सेट अप, फंड फ्लो मॅनेजमेंट, पेमेंट्सला टप्पे जोडणे, बिलिंग, संग्रहण, ऑनलाइन मोजमाप पुस्तकांच्या अंमलबजावणीचे संपूर्ण As-Is and To-Be विश्लेषण करणे. प्रोजेक्ट मॅनेजमेंट सिस्टम), मालमत्ता आणि इन्व्हेंटरी डेटाबेस आणि त्याचा परफॉर्मन्स / आउटकम बेस्ड बजेटिंग इ.

७ प्रकल्प व्यवस्थापन (परिणाम / कामगिरी) आधारित वित्तीय व्यवस्थापन प्रणालीच्या अंमलबजावणीत एमजेपीला सहाय्य करणे.

८ फंड मॉनिटरिंग यंत्रणा, workflows, पेमेंट्सला परफॉर्मन्स आणि सहाय्यक प्रणालींसह दुवा साधण्यासाठी एमजेपीला सहाय्य करणे. मानकीकरणासाठी शिफारशी देताना सल्लागारांनी RWSS ग्रामीण पाणी पुरवठा क्षेत्रातील विद्यमान आणि आगामी योजनांचा अभ्यास करणे.

९ मजीप्राला तीन वर्षांच्या MTEF) मध्यावधी खर्च / (एफआरबीएम मार्गदर्शक तत्त्वांवर आधारित योजनानिहाय / प्रकल्पनिहाय / विभाग स्तरीय अर्थसंकल्प तयार करण्यास सहाय्य करणे.

१० अन्य राज्य जल संस्था (राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील) असलेल्या विद्यमान प्रणालींचे बेंचमार्क करणे, gaps ओळखून भविष्यातील रोडमॅप तयार करणे

११ जल क्षेत्रातील डॅश बोर्डिंग, डायनॅमिक रिपोर्टिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, जनरल, लेजर, SCADA, मशीन लर्निंग आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर ओळखणे.

१२ निधी देखरेखीसाठी अहवाल आणि डॅशबोर्डसह परिकल्पित वित्तीय व्यवस्थापन प्रणालीसाठी कार्यात्मक आवश्यकता तपशील (FRS) अंतिम करणे. विद्यमान आणि आगामी योजना सामावून घेण्यासाठी सिस्टमला लवचिक असणे आवश्यक आहे. भौतिक आणि आर्थिक

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

प्रगती समाविष्ट करण्यासाठी अहवाल अंतिम करणे

१. योजना निहाय, २. उपांग निहाय उपांग निहाय, ३. घटक निहाय, ४. कामाची मुदत, ५. पूर्ण झालेले/ अपूर्ण पूर्ण झालेले, ६. विलंबाची कारणे , ७. Financial Closer + लेखा परीक्षण अहवाल, ८. देखभाल दुरुस्ती इ.

१३ मार्केटमधील सोल्यूशन उपलब्धतेवर आधारित आणि त्यासाठी तयार केलेल्या RFP / RFQ / EoI च्या आधारे COTS / BESPOKE सोल्यूशची ओळख आणि अभ्यास

१४ या प्रणालीच्या अंमलबजावणीमध्ये एमजेपीला समर्थन देण्यासाठी: बिड प्रक्रिया व्यवस्थापन (आवश्यक असल्यास), UAT, पायलटिंग, रोल आउट, क्षमता बांधणी इ.

**ब खरेदी व माहिती व तंत्रज्ञान (IT) व्यवस्थापनासाठी सहाय्य :-**

१५ सरकारच्या पाठिंब्याने विद्यमान/नवीन कार्यक्रमांसाठी मार्गदर्शक तत्त्वे, योजना, पुस्तिक देखरेख आणि मूल्यांकन चौकट, विद्यमान हस्तपुस्तिकांचे पुनरीक्षण, आर्थिक अधिकार/ को इत्यादींच्या अंमलबजावणीत एमजेपीला सहाय्य करणे. ऑफ इंडिया, वर्ल्ड बँक, एडीबी इ.

१६ महाराष्ट्र शासन/ केंद्र शासन/ जागतिक बँक यांच्या नियमांच्या चौकटीत राहून वस्तु व सेवाक यांच्या निविदा कागदपत्रांचे मानांकने ठरविण्यास मजीप्रास सहाय्य करणे

१७ तांत्रिक उपाययोजना व खरेदी साठी मदत करणे म्हणजेच आयटी तसेच नॉन-आयटी वस्तू, संगणक व परिघीय वस्तू, आयटी नेटवर्किंग घटक, या घटकांची स्थापना, आणि ग्रामीण जल विभाग कार्यक्रमांच्या अंमलबजावणी, ऑपरेशन, देखरेखीसाठी आणि मुल्यांकनासाठी सहाय्य करणे.

१८ RFP, ई-निविदा प्रक्रिया, तांत्रिक वैशिष्ट्ये, निविदांचे मूल्यांकन, preparation of contract वर्क ऑर्डरची तयारी/खेरेदिसाठीचा करारानामा बाबत तांत्रिक उपाययोजना सुचवणे अर्थात वर नमूद केल्याप्रमाणे आयटी तसेच बिगर आयटी वस्तू व सेवा.

१९ मजीप्राला ऑनलाईन देखरेखीची साधने जसे की डॅशबोर्ड प्रभावी देखरेखीसाठी आणि सेट निर्देशकांवरील योजनांच्या कामगिरीचा आढावा घेण्यासाठी विकास /तयारी / अद्ययावत करण्यासाठी सहाय्य करणे. अशी साधने निर्णय घेण्यास आणि आउटपुटचे परिष्करण सुलभ करतील ज्यायोगे कार्यप्रदर्शन मानसिकतेस प्रोत्साहित केले जाईल.

**क एकात्मिक प्रकल्प व्यवस्थापन पथक :-**

२० मजीप्राला उच्चस्तरीय कार्यक्रमात व प्रकल्प व्यवस्थापनात सहाय्य करणे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

२१. तांत्रिक सहाय्य व सुधारणा कामी धोरण ठरविणे.

१.राज्य निहाय पाणी पुरवठ्याचे जाळे तयार करणे. २. राज्य पाणी पुरवठा सुरक्षा आराखडा ,३. ग्रे वॉटर चे शुध्दीकरण करुन पुनर्वापर करणे.

२२ मजीप्राला सर्वसमावेक्षक माहिती व्यवस्थापनाची चौकट तयार करणे कामी सहाय्य करणे.

२३ प्रकल्प सनद, प्रकल्प व्यवस्थापन चौकट, एमआयएस फ्रेमवर्क, रिपोर्टिंग फ्रेमवर्क, भागधारकांच्या गुंतवणूकीची चौकट, प्रकल्प निकालांचे मापन फ्रेमवर्क स्थापित करण्यात एमजेपीला सहाय्य करणे.

२४ बिड प्रक्रिया व्यवस्थापन, क्षमता बांधणी, प्रशिक्षण, बदल व्यवस्थापन इ. परिवर्तन घडविण्यास माजीप्राला मदत करणे.

मजीप्राच्या विविध स्तरावरील व्यवस्थापनासाठी २ व्यवस्थापक, अभियांत्रिकी व्यवस्थापनासाठी २ व्यवस्थापक व आस्थापना व्यवस्थापनासाठी २ व्यवस्थापकीय सल्लागारांची नेमणूक करणे आवश्यक आहे. व्यवस्थापनापोटी १ वर्षाच्या संचालनासाठी अंदाजित रुपये २.४० कोटी खर्च अपेक्षित आहे.

मजीप्राच्या विविध स्तरावरील व्यवस्थापनासाठी सुधारणा करण्याच्या दृष्टीने निश्चित करण्यात आलेल्या कामाची व्याप्ती व प्रारुप निविदा पत्र प्रकरणी मा. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांचे अभिप्राय घेणे गरजेचे आहे. त्यांचेकडून माहिती घेऊन गरज पडल्यास प्रारुप निविदेत आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यात येणार आहे. सदर मुद्यांच्या अनुषंगाने साधकबाधक चर्चा होऊन, खालील ठराव घेण्याचे ठरले.

**ठराव : असा ठराव करण्यात येतो की**

भविष्यात मजीप्रास होणारी आर्थिक तुट, व वाढत्या रिक्त पदांची संख्या लक्षात घेता, मजीप्राच्या विविध स्तरावरील बाबींचे व मनुष्यबळाचे नियोजन करणे गरजेचे असल्याने, विविध स्तरावरील व्यवस्थापनाच्या संचालनासाठी व अभियांत्रिकी व्यवस्थापनाच्या कामा करिता प्रस्तावित नुसार सल्लागाराची नेमणूक करण्यासाठी खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१) योजना व्यवस्थितपणे व वेळेत पूर्ण करुन कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने योजनांसाठी अभियांत्रिकी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांचे, योजनेच्या किंमतीनुसार पॅनल तयार करणे

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

तसेच RFP प्रारुप निविदा पत्र व करारनाम्याचा मसुदा अंतिम करुन त्यांना नोंदीत करुन घेऊन त्यांचेकडून काम करुन घेण्याच्या बाबीस मान्यता देण्यात येत आहे.

२) मजीप्राच्या विविध स्तरावरील संचालनाकरिता कामाची व्याप्ती लक्षात घेऊन विविध स्तरावरील विविध व्यवस्थापनांसाठी सल्लागाराची नेमणूक करण्यास, त्यासाठी आवश्यक रुपये २.४० कोटी खर्चास व पुढील निविदा प्रक्रिया करणे कामी मान्यता देण्यात येत आहे.

याबाबत पुढील निविदा प्रक्रिया कार्यवाही करण्यास सदस्य सचिव, मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे

**कार्यक्रम बाब क्र.१६ : वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना, टप्पा-३, ता.पनवेल, जि.रायगड. सुधारित योजनेस तसेच मजीप्राच्या हिश्याच्या सुधारित रक्कमेस मान्यता मिळणेबाबत.**

विषयांकित प्रकरणी अधीक्षक अभियंता मजीप्रा मुख्यालय यांनी सविस्तर माहिती संचालक मंडळास अवगत केली.

सिडको, जे.एन.पी.टी., पनवेल महानगरपालिका क्षेत्र व एम.एम.आर.डी.ए. या ग्राहक संस्थांची एकूण २२८ द.ल.लि. / प्रति दिन पाणी मागणी गृहीत धरुन रु.३६४.११ कोटी निव्वळ व रु.४०८.७९ कोटी ढोबळ इतक्या किमतीच्या वाढीव न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना, टप्पा-३ योजनेस मा.संचालक मंडळाच्या १४३ व्या बैठकीत प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. सदर बैठकीमध्ये योजनेतील पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणारी रक्कम ही केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणा-या हिश्याची रक्कम अमृत अभियांनातर्गत मंजुर करण्यात आलेली आहे.

अमृत कार्यक्रमांतर्गत नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.अमृत/२०१८- प्र.क्र.५१६ /नवि-३३ दि.१२ फेब्रुवारी २०१९ अन्वये पनवेल मनपाच्या पाणी मागणी च्या अनुषंगाने "पनवेल शहराच्या पाणी पुरवठा (न्हावा शेवा)" योजनेस रु.१७३.२७ कोटी किमतीस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. त्यानुसार वित्तीय आकृतीबंध पुढील प्रमाणे आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| अ. क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाव | मंजूर किंमती पैकी अमृत अभियांनांतर्गत अनुज्ञेय मंजूर किंमत (डीपीआर नुसार) | केंद्र शासनामार्फत अनुज्ञेयअनुदान (प्रकल्प किंमतीच्या ५०%) | राज्य शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या२५%) | महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा हिस्सा (प्रकल्प किंमतीच्या२५%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | पनवेल महानगर पालिका | रु.१७३.२७ कोटी | रु.८६.६३५ कोटी | रु.४३.३१७५ कोटी | रु.४३.३१७५ कोटी |

सन २०१८-१९ च्या दरसूचीनुसार तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आलेल्या अंदाजपत्रकानुसार मजीप्राच्या हिश्याची रक्कम रु.१६.१० कोटी इतकी येते. अमृत कार्यक्रमांतर्गत यातील रु.१७३.२७ कोटी किमतीस मान्यता प्रदान करण्यात आली आहे. उपरोक्त तक्त्यात नमूद केल्यानुसार मजीप्रा चा हिस्सा रु.४३.३२ कोटी व अमृत कार्यक्रमांतर्गत मंजूर न होणारा हिस्सा रु.१२.८३ कोटी (रु.१८६.१० कोटी - रु. १७३.२७ कोटी =१२.८३ कोटी) असा एकूण रु.५६.१५ कोटी मजीप्राकडून उपलब्ध करुन देण्यास मा. संचालक मंडळाच्या १४३ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर कामाची रु.२४७.६६ कोटी किंमतीची निविदा तीन वेळा प्रसिद्ध करण्यात आली होती. तिसऱ्या मागणी करिता तिन ठेकेदारानी भाग घेवून तिनही ठेकेदार वित्तीय लिफाफा उघडण्यास पात्र ठरले. त्यानुसार निविदेचा वित्तीय लिफाफा उघडण्यात येऊन निविदेसाठी मे. जीव्हीपीआर इंजिनिअरिंग लि, हैद्राबाद यांचा सर्वात कमी किंमतीचा, निविदेतील अंदाजित किंमतीच्या ५४.०० % इतक्या जादा दराचा देकार प्राप्त झाला. त्यानुषंगाने कंत्राटदाराच्या देकाराची किंमत रु.३,८१,४१,०४,९२७/- येते.

ठेकेदाराच्या जादा दराच्या देकाराच्या अनुषंगाने मजीप्रा मध्यवर्ती कार्यालय स्तरावर ठेकेदारासोबत २ वेळा वाटाघाटी करण्यात आल्या असून ठेकेदाराने निविदा किमतीवर ३६.९३९% जादा दराचा रु ३३९,१५,६५,४९०/- किमतीचा सुधारित देकार सादर केला. ठेकेदाराच्या सदर सुधारित देकारानुसार निविदा प्रस्ताव मा. निविदा समितीच्या दि. २४.२.२०२० रोजीच्या १२६ व्या

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

बैठकीत सादर करण्यात आला होता.सदर बैठकीत ठेकेदारासोबत निविदा समितीमध्ये वाटाघाटी करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार निविदा समितीच्या दि.६.३.२०२० रोजीच्या १२७ व्या बैठकीत ठेकेदारासोबत वाटाघाटी करण्यात येऊन, ठेकेदाराने निविदा किमतीवर २६.९३% जादा दराचा व रु.३१४.३८ कोटी किमतीचा सुधारित देकार सादर केला. त्यानुसार निविदेचे मुल्यांकन खालील प्रमाणे आहे.

| ठेकेदाराचे नाव | निविदेची किंमत (मजीप्रा सन २०१८-१९ व सा.बां. दरसुची सन २०१७-१८) | देकाराची किंमत व टक्केवारी | निविदेतील कामाची चालू दरसूची (मजीप्रा सन २०१९-२० व सार्वजनिक बांधकाम विभाग २०१९-२०) नुसार एकूण मुल्यांकित किंमत व देकाराची तुलनात्मक टक्केवारी |
|---|---|---|---|
| मे.जी.व्ही.पी.आर इंजिनिअर्स लि. हैद्राबाद | रु. २४७,६६,९१,५११/- | रु. ३१४,३८,०५,३७२/- २६.९३% जादा | रु.२८५,९३,०४,५६५/- ९.९५% जादा |

उपरोक्तप्रमाणे देकारास निविदा समितीच्या १२७ व्या बैठकीत खालील अटींच्या अधीन राहून मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

खालील बाबींची पुर्तता झाल्यानंतरच ठेकेदारास कार्यादेश देण्यात यावेत.

i) ठेकेदाराच्या सुधारीत देकारनुसार योजना सुधारीत करुन सुधारीत योजनेस तसेच त्यानुसार पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणाऱ्या मजीप्राच्या सहभागाच्या रक्कमेस (अमृत कार्यक्रमांतर्गत मंजुर केंद्र शासन व राज्यशासन हिस्सा वगळुन) मा. संचालक मंडळ मजीप्राची मान्यता घेण्यात यावी.

ii) पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणाऱ्या सहभागाची रक्कम नगरविकास विभागामार्फत अमृत कार्यक्रमांतर्गत मंजुर असल्याने सदर निविदा प्रस्तावास अमृत कार्यक्रम राज्यस्तरीय तांत्रिक समितीचीही मान्यता घेण्यात यावी.

iii) योजनेतील सर्व सहभागी संस्थांना स्विकृत निविदेच्या अनुषंगाने सहभागाची रक्कम कळवुन आवश्यक करारनामा करण्यात यावा.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

१२/ ६९



उपरोक्त शिवाय,

iv) योजनेतील विविध उपांगाकरिता लागणाऱ्या जागा तसेच रेल्वे/रस्ते परवानग्या तातडीने उपलब्ध करुन घेण्यात याव्यात.

v) योजनेतील विविध सहभागी संस्थांकडुन प्राप्त होणाऱ्या सहभागाच्या रक्कमेनुसार कामे हाती घेण्यात यावीत.

मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण यांची सदर योजनेची आखणी करताना ५३ द.ल.लि./दिन इतकी पाणी मागणी होती. परंतु अतिरिक्त महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी त्यांचे पत्र क्रं. MMRDA/RHD/D-३७८/१७५/२०१९ Dt.१७/१२/२०१९ अन्वये एम.एम.आर.डी.ए. ची ५३ द.ल.लि/दिन पाणी मागणी ही नैना आणि रोहिंजन या भागाकरीता आहे. नैना भागाकरीता पायाभूत सुविधा या सिडको मार्फत राबविण्यात येणार असल्याने केवळ रोंहिजन भागाकरीता एम.एम.आर.डी.ए .ची पाणी मागणी १९ द.ल.लि. प्रतिदिनी असल्याचे कळविले आहे. त्यामुळे नैना भागाकरीताच्या ३४ द.ल.लि./दिन पाणी मागणीच्या अनुषंगाने होणा-या अंशदानाची जबाबदारीही सिडकोची आहे व त्याअनुषंगाने सिडकोने त्यांचे अर्ध शासकीय पत्र क्र.CIDCO/MP/२३५, दि.२.१.२०२० अन्वये ६९ द.ल.लि./दिन (३४+३५=६९) पाणी मागणी करीता येणा-या भांडवली अंशदानाची रक्कम भरण्यास तयार असल्याचे म.जी.प्रा.स कळविले आहे.

एम.एम.आर.डी.ए. च्या सुधारीत पाणी मागणीच्या अनुषंगाने सर्व सहभागी संस्थांची पाणी मागणी तसेच ठेकेदाराच्या जादा दराच्या देकारानुसार तसेच यांत्रिकी कामे जी २०१८-१९ च्या दरसूचीनुसार होती तीसुद्धा दरसूची सन २०१९-२० नुसार सुधारित केल्याने सहभागी संस्थांचे भांडवली अंशदान ढोबळपणे खालील प्रमाणे राहणार आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

| अ. क्र. | ग्राहक संस्था | | पाण्याची मागणी (द.ल.लि.) | सहभाग रुपये कोटीमध्ये (ढोबळ) |
|---|---|---|---|---|
| १. | सिडको | | ६९ | ११८.७६ |
| २. | जे.एन.पी.टी. | | ४० | ५९.३९ |
| ३. | अमृत अभियानांतर्गत मजीप्रा (पनवेल मनपा) | | १०० | २११.५१ |
| | केंद्र शासन हिस्सा | ८६.६३ | | |
| | राज्य शासन हिस्सा | ४३.३२ | | |
| | स्था.स्व.संस्थेकरीता मजीप्राचा हिस्सा | ८१.५६ | | |
| | एकूण | २११.५१ | | |
| | मजीप्रा हिस्सा (अमृत कामाव्यतिरिक्त) | | | १२.८३ |
| | मजीप्रा हिश्य्यावरील ई टी पी | | | २०.१९ |
| ४. | एम.एम.आर.डी.ए. | | १९ | ७०.७५ |
| | एकूण(मजीप्रा हिश्य्यावरील ई टी पी रु.२०.१९ कोटी सह ):- | | २२८ | ४९३.४२ |

पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणाऱ्या सहभागाची रक्कम अमृत कार्यक्रमांतर्गत नगरविकास विभागामार्फत मंजुर असल्याने सदर निविदा प्रस्तावास अमृत कार्यक्रम राज्यस्तरीय तांत्रिक समितीचीही मान्यता आवश्यक असल्याने, निविदा प्रस्ताव मजीप्रा मध्यवर्ती कार्यालयाचे पत्र क्र. मजीप्रा/सस/ताशा-३/४९४ दि. १७.७.२०२० अन्वये शासनाच्या नगर विकास विभागास सादर करण्यात आला होता. सहसचिव (नवि-३३), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.बैठक-२०२०/प्र.क्र.४९/नवि-३३, दि.१४.८.२०२० अन्वये, पनवेल पाणी पुरवठा प्रकल्प (न्हावा-शेवा) स्थापत्य कामाचा समावेश असलेल्या कामाच्या निविदा स्वीकृतीबाबत मजीप्राच्या निविदा समितीने घेतलेल्या निर्णयास अमृत अभियानातील घटकांच्या अनुषंगाने अमृत कार्यक्रम राज्यस्तरीय तांत्रिक समितीने मान्यता दिल्याचे कळविले आहे. सदर पत्रात, या संपूर्ण प्रकल्पातील अमृत अभियानांतर्गत राज्य शासनाकडून केंद्र व राज्य हिस्सा रु.१२९.९५ कोटी इतका निधी देण्यास मूळ प्रशासकीय मान्यतेनुसार, मान्यता देण्यात आली आहे. त्या व्यतिरिक्त येणारे संपूर्ण दायित्व कार्यान्वयन यंत्रणा असलेल्या मजीप्राने व त्यांच्या संपूर्ण प्रकल्पात समाविष्ट असलेल्या अन्य यंत्रणा (उदा. सिडको, जेएनपीटी, एमएमआरडीए ) यांच्या

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

मार्फत उभारण्यात येईल व राज्य शासनाकडून यासाठी कोणतेही वाढीव अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही अशी अट नमूद करण्यात आली आहे. तसेच प्रारुप निविदा प्रपत्रातील अटी व शर्तींच्या अधीनतेने शासनाच्या निविदा प्रक्रियेच्या विहीत कार्यपध्दतीस अनुसरुन कार्यादेश १० दिवसात देण्याची पुढील कार्यवाही करण्याबाबतही नमूद करण्यात आले आहे.

ठेकेदाराच्या जादा दराच्या देकारानुसार तसेच योजनेतील यांत्रिकी कामे जी २०१८-१९ च्या दरसूचीनुसार होती तीसुद्धा दरसूची सन २०१९-२० नुसार सुधारित केल्याने रु. ४९३.४२ कोटी (मजीप्रा हिश्य्यावरील ई टी पी सह) सुधारित योजेनेस तसेच पनवेल महानगरपालिका क्षेत्राच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने येणारी मजीप्राच्या हिश्य्याची सुधारित रक्कम रु. ९४.३९ कोटी मजीप्राच्या घसारा निधीतून उभारण्यास मजीप्राच्या संचालक मंडळाची मान्यता आवश्यक आहे.

मा. नगर विकास मंत्री यांनी मजीप्रा कडे उपलब्ध असलेल्या घसारा निधी बाबत विचारणा केली. त्यावर मजीप्रा कडे रु. ७६८.३० कोटी घसारा निधी उपलब्ध असल्याचे संचालक वित्त मजीप्रा यांनी सांगितले.

उपरोक्त नुसार चर्चा होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात येत आहे.

**ठराव: असा ठराव करण्यात येतो की,**

१) न्हावा शेवा पाणी पुरवठा योजना टप्पा-३, ता.पनवेल, जि.रायगड या योजनेस म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाच्या दि..०१.११.२०१८ रोजी झालेल्या मजीप्राच्या १४३ व्या बैठकीत रु. ४०८.७९ कोटी ढोबळ (२२८ द.ल.लि./दिन क्षमता) किंमतीस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. त्याच बरोबर पनवेल महानगर पालिकेच्या पाणी मागणी च्या अनुषंगाने येणारी रक्कम रु.१७३.२७ कोटी केंद्र शासनाच्या अमृत कार्यक्रमांतर्गत नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.अमृत-२०१८/प्र.क्र.५१६/नवि-३३ दि.१२ फेब्रुवारी २०१९ अन्वये “पनवेल शहराच्या पाणी पुरवठा (न्हावा शेवा उद्धव) प्रकल्पास” मंजुर करण्यात आलेली आहे.

आता सदर कामाची निविदा कार्यवाही करण्यात आलेली असून न्युनतम देकार सादर केलेल्या ठेकेदाराने अध्यक्ष, मजीप्रा निविदा समिती यांच्या स्तरावर वाटाघाटी अंती दिलेल्या निविदा किमतीवर २६.९३% जादा देकारानुसार तसेच योजनेतील यांत्रिकी कामे जी २०१८-१९

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

च्या दरसूचीनुसार होती तीसुद्धा दरसूची सन २०१९-२० नुसार सुधारित केल्याने रु. ४९३.४२ कोटी ढोबळ किमतीच्या सुधारित योजनेस मान्यता देण्यात येत आहे.

२) पनवेल महानगरपालिकेच्या पाणी मागणीच्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा व अमृत कार्यक्रमांतर्गत मंजुर न होणारा हिस्सा याची रक्कम रु.५६.१५ कोटी मजीप्राच्या घसारा निधीतून परत करण्याच्या अटींच्या अधीन राहुन उपलब्ध करुन देण्याबाबत संचालक मंडळाच्या १४३ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. आता उपरोक्त रक्कम तसेच निविदा कार्यवाही झाल्याने मजीप्रा निविदा समितीच्या १२७ व्या बैठकीत ठेकेदाराच्या वाढीव स्वीकृत देकाराच्या अनुषंगाने पनवेल मनपाच्या पाणी मागणी नुसार येणा-या हिश्श्यामध्ये होणारी वाढ रु.३६.९३ कोटी त्याचबरोबर योजनेतील यांत्रिकी कामे जी २०१८-१९ च्या दरसूचीनुसार होती तीसुद्धा दरसूची सन २०१९-२० नुसार सुधारित केल्याने होणारी वाढ रु१.३१ कोटी अशी एकूण रु.९४.३९ कोटी (रु.४३.३२+रु.१२.८३+रु.३६.९३+रु.१.३१) सुधारित रक्कम (मजीप्रा इटीपी वगळून) मजीप्राच्या घसारा निधीतून,परत करण्याच्या अटीच्या अधीन राहून ( सदर योजनेच्या उत्पन्नातून तेवढी रक्कम पुन:श्च घसारा निधीमध्ये जमा करण्याच्या अधीन राहून) उपलब्ध करुन देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

३) सदर योजना मंजूर केलेल्या मजीप्राच्या संचालक मंडळाच्या १४३ व्या बैठकीच्या इतिवृत्तातील (कार्यक्रम बाब क्रं.३) ठरावामध्ये नमुद केलेल्या अटींचे पालन करण्यात यावे.

४) सदरची योजना ३० महिन्यात पूर्ण करण्याच्या अनुषंगाने योग्य ते नियोजन करण्यात यावे.

यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरीता सदस्य सचिव मजीप्रा यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.१७ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते व निवृत्ती वेतनाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या रकमेमधून कर्मचाऱ्यांच्या वेतन व निवृत्ती वेतन दायित्वाच्या अदायगीबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.२.९.२०२० रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते व निवृत्ती वेतनाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या रक्कमेमधून कर्मचाऱ्यांच्या

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

वेतन व निवृत्ती वेतन दायित्वाच्या अदायगीबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चेअंति सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांचे वेतन व भत्ते व निवृत्ती वेतनाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे उपलब्ध असलेल्या रक्कमेमधून कर्मचाऱ्यांच्या वेतन व निवृत्ती वेतन दायित्वाच्या अदायगीबाबत, कार्यक्रम बाब क्र.१७ अन्वये संचालक मंडळाने मान्यता प्रदान केली. खालील प्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.मजीप्रा/२१४/प्र.क्र.३३/(आ.), पापु-२३, दि.२३.३.२०१७ च्या निर्णयानुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्ते तसेच सेवा निवृत्ती वेतनाचे दायित्व शासनाने स्विकारले आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांचे माहे जुन, २०२० देय जुलै, २०२० मधील वेतन व भत्ते तसेच निवृत्ती वेतनाकरीता प्राप्त झालेला महसूल रु.४५.०३ कोटी व झालेला खर्च रु.५३.२५ कोटी आहे. त्यामुळे रु.८.२२ कोटी तूट आलेली आहे. सदर तूट भरून काढण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उपलब्ध असलेल्या निधीतून तात्पुरत्या स्वरुपात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांचे माहे जून, २०२० देय जुलै, २०२० मधील वेतन व भत्ते तसेच निवृत्ती वेतनाची अदायगी केलेली आहे. त्यास मान्यता देण्यात येत आहे. यापुढे अशा प्रकारची तूट झाली तर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला वेतन व भत्ते सेवा निवृत्ती वेतनाचे दायित्वाचा निधी शासनाकडून प्राप्त होईपर्यत येणारी तूट महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कंत्राटदारांच्या अनामत रक्कमा, अल्प मुदतीच्या ठेवीवरील व्याजाच्या रक्कमांच्या उपलब्ध असलेल्या रक्कमेमधून वापरण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास मान्यता देण्यात येत आहे. तसेच शासनाकडून सदर रक्कम प्राप्त झाल्यानंतर त्यातून केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती कंत्राटदाराचे सुरक्षा अनामत रक्कम, व अल्प मुदतीच्या ठेवीवरील व्याज व लेख्यामध्ये करण्यात येईल.

याबाबत सदरची कार्यवाही करण्यासाठी म.जी.प्रा.सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र.१८ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या सोसायट्या / इमारत/ संकुले यांना वाढीव नळ जोडणीकरिता आकारावयाचे भांडवली अंशदान बंद करणे बाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.२.९.२०२० रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या सोसायट्या/इमारत/संकुले यांना वाढीव नळ जोडणीकरिता आकारावयाचे भांडवली अंशदान बंद करणेबाबत सविस्तर माहिती संचालक मंडळास देण्यात आली. चर्चे अंति महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या नागरी पाणी पुरवठा केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये असलेल्या सोसायट्या / इमारत/ संकुले यांना वाढीव नळ जोडणीकरिता आकारावयाचे भांडवली अंशदान बंद करणे बाबत कार्यक्रम बाब क्र.१८ अन्वये संचालक मंडळाने चर्चेस घेतली. त्यावर साधकबाधक चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित केला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, गृहसंकुले/ गृहनिर्माण संस्था/ इमारती/ निवासी संकुले/ विकासक यांचेकडून नवीन नळ जोडणी किंवा वाढीव नळ जोडणीकरीता मागणी आल्यास नळ जोडणीकरीता भरावयाच्या भांडवली अंशदानाची आकारणी सुरु ठेवण्यात यावी. अंशदानाच्या दराच्या अनुषंगाने प्रस्ताव पुढील संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये सादर करण्याचे निर्देश संचालक मंडळाने दिलेत.

याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

**मा.संचालक मंडळाच्या १४६ व्या बैठकीमध्ये खालील विषय अवगत केले.**

१) बेलापूर, नवी बेलापूर येथील सिडको भवन, (दक्षिण कक्ष) येथील मजीप्राची ४थ्या मजल्यावरील जागा भाडेतत्वावर दिलेबाबत.

२) कार्यालयीन वापराकरिता मित्तल टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई येथे दुसऱ्या मजल्यावर भाडेतत्वावरील जागे बाबत.

३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या कायदा व कामगार अधिकारी यांचे मानधनात रु.५०,०००/- वरून रु.६०,०००/- प्रतीमहा करणेबाबत.

४) दि.१.१.२०१६ पासून सुधारित वेतन श्रेणी मंजूर करण्याबाबत.
सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली सुधारित वेतनश्रेणी/वेतन संरचना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी कर्मचाऱ्यांना लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. शासनाकडून मंजूरी प्राप्त झालेनंतर त्याअनुषंगाने योग्य तो प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीत सादर करणेत येईल.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संचालक मंडळाची बैठक दि.२.९.२०२० रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये चार विषय संचालक मंडळासमोर अवगत करण्यासाठी ठेवण्यात आले होते. मा.सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांनी वरील चार विषयाबाबत अवगत केले.

अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्वच्छता

सदस्य सचिव,
म.जी.प्रा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, दुसरा मजला, (द.क.)बेलापूर,नवी मुंबई -४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७ १६७३, २७५७ ०१६६, २७५७ १६७७.
फॅक्स : २७५७ ०९६९, २७५७ १६६६.


**क्र.मजीप्रा-२०२०/सभा-१४६/(०८)/आ.४** **दिनांक :१८.९.२०२०**

**दि.२.९.२०२० रोजी रोजी झालेल्या म.जी.प्रा. संचालक मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त वाटप करणेबाबत..**

**प्रति,**

मा.मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

अतिरिक्त मुख्य सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

अपर मुख्य सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (न.वि.२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

**प्रत माहितीसाठी.**

खाजगी सचिव (मा.मंत्री, पा.पु. व स्व. तथा अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.

सोबतचे इतिवृत्त मा.मंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

खाजगी सचिव (मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा उपाध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कार्यालय. मंत्रालय, मुंबई.

सोबतचे इतिवृत्त मा.राज्यमंत्री, पा.पु. स्व. यांचे अवलोकनार्थ सादर करावे, ही विनंती.

**प्रत : माहितीसाठी व त्वरित कार्यवाहीसाठी.**

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

मुख्य अभियंता. म.जी.प्रा. प्रादेशिक विभाग, ठाणे /पुणे /नाशिक/औरंगाबाद /अमरावती/ नागपूर.

~~अधीक्षक अभियंता, म.नि.सं. व सं., मित्तल चेंबर्स, मुंबई.~~

अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई.

उप मुख्य लेखाधिकारी (१ / २) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

आस्थापना अधिकारी (दक्षता), म.जी.प्रा. सिडको भवन, नवीन मुंबई.

उप अभियंता तथा मालमत्ता व्यवस्थापन (कक्ष – ९) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

उप अभियंता (आय.टी.सेल), मित्तल चेंबर्स, मुंबई.

प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

सर्व कक्ष अधिकारी / कार्यासन अधिकारी (आस्थापना - ) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

**सोबतचे इतिवृत्तातील आपल्या कार्यालयाशी संबंधीत कार्यक्रम बाबीवर त्वरित योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा कार्यपुर्ती अहवाल १० दिवसांत मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.**

खाजगी सचिव (मा.मंत्री, पा.पु. व स्वच्छता) तथा अध्यक्ष, मजीप्रा यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई

उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

संचालक (वित्त) म.जी.प्रा. सिडको भवन, नवी मुंबई.

अधीक्षक अभियंता, (मुख्यालय,) मजीप्रा, मुंबई.